प-3

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
माहिती व तंत्रज्ञान विभाग
क्र.मातंवि/ 8/कावि/ /2018
दिनांक- / 12 /2018

**विषय:- मुख्य लेखापरिक्षण विभागाकडे सादर करणेत येणा-या अनुपालन विषयक कामकाजाबाबत...**

संदर्भ:- **1**) पत्र क्र. मुलेप/गट क्र. 6/कावि/184, 2018, दि. 07/12/2018

परिपत्रक,

पिंपरी चिंचवड महानगरपालकेतील विविध विभागांसाठी **National Mission Mode** प्रकल्पांतर्गत विविध संगणक प्रणाली विकसित करणेत आलेल्या आहेत. त्यानुसार मुख्यलेखापरिक्षण कार्यालयाकडील लेखापरिक्षण कार्यपद्धतीच्या अनुषंगाने " लेखापरिक्षण संगणक प्रणाली" तयार करणेत आलेली आहे. सदर प्रणालीद्वारे मुख्य लेखा परिक्षण विभागाकडून विविध विभागांना आक्षेप पाठविले जातात. त्यांची आक्षेपांची पुर्तताही संबंधित विभागाकडून संगणक प्रणालीद्वारे करणे आवश्यक आहे.

परंतू माझे असे निदर्सनास आले आहे की,विविध विभागामार्फत लेखापरिक्षण विषयक पुर्तता करतांना सदर लेखापरिक्षण संगणक प्रणालीद्वारे आक्षेप पुर्तता प्राप्त होत नसल्याल्यामुळे निरस्त झालेले आक्षेप व त्यामध्ये दाखविणेत आलेली आक्षेपाधिन व वसुलपात्र रक्कम मुळ अहवालामधुन कमी करण्यास मुख्यलेखापरिक्षण विभागास अडचण निर्माण होत आहे. तसेच लेखापरिक्षण संगणक प्रणालीद्वारे आक्षेप पुर्तता प्राप्त न झाल्यामुळे मुख्यलेखापरिक्षण कार्यालयास संबंधित विभागास पुर्ततेविषयक पत्रव्यवहार करता येत नाही.

सबब, या परिपत्रकान्वये सर्व विभागप्रमुखांना कळविणेत येते की, विविध विभागामार्फत लेखापरिक्षण विषयक आक्षेपांची पुर्तता करतांना "लेखापरिक्षण संगणक प्रणाली" द्वारे करणेत येतील याची दक्षता घेणेत यावी. अन्यथा आक्षेपाधिन व वसुलपात्र रक्कम मुळ अहवालामधुन कमी न झालेस त्यास संबंधित विभागप्रमुख जबाबदार राहतील.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रति,
सर्व संबंधित विभाग